CMYK

## डिसेंबरमध्ये बेरोजगारीचा दर वाढला, १६ महिन्यांतील उच्चांक

**नवी दिल्ली :** आज आपण नवीन वर्षाचं स्वागत केलं. सर्वत्र नव्या वर्षाचा उत्साह पाहायला मिळाला. अनेकांनी नवनवीन संकल्प केले. काहींनी नवीन वर्षातील आव्हानांवर देखील चर्चा केली. निश्चितपणे नवीन वर्षात देशासमोर अनेक आव्हाने असतील. यामध्ये वाढत्या बेरोजगारीच्या दरावर नियंत्रण ठेवणे हे सर्वात मोठे आव्हान असणार आहे. सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमीने बेरोजगारीबाबत काही आकडेवारी जाहीर केली आहे. त्या आकडेवारीनुसार, भारतातील बेरोजगारीचा दर डिसेंबर २०२२ मध्ये ८.३% पर्यंत वाढला आहे, जो गेल्या १६ महिन्यांतील सर्वोच्च आहे. उचखए च्या आकडेवारीनुसार देशातील शहरी बेरोजगारीचा दर डिसेंबरमध्ये ८.९६% वरून १०.०९% पर्यंत वाढला आहे, तर ग्रामीण भागातील बेरोजगारीचा दर %.५५% वरून ७.४४% वर आला आहे.

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

## शेकापचे ज्येष्ठ नेते केशवराव धोंडगे यांचे निधन

**नांदेड :** मराठवाड्याची मुलुखमैदानी तोफ अशी ओळख असलेले शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते केशवराव धोंडगे यांचे निधन झाले आहे. ते १०२ वर्षांचे होते. धोंडगे यांच्यावर औरंगाबादमधील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यांच्या निधनाने सर्वसामान्य जनतेच्या समस्यांसाठी लढणारा लढवय्या नेता हरपला अशी प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. केशवराव धोंडगे हे प्रदीर्घकाळ विधिमंडळाचे सदस्य राहिलेले आहेत. त्यांनी विधानसभेबरोबरच लोकसभेतही जनतेचे प्रतिनिधीत्व केले आहे. केशवराव धोंडगे हे ५ वेळा आमदार म्हणून विधानसभेत निवडून गेले होते. तसेच एक वेळा ते लोकसभेची निवडणूकही जिंकले होते. सर्वसामान्य जनतेच्या समस्या ते सभागृहात पोटतिडकीने मांडत असत. विधानसभेत त्यांची अनेक भाषणे गाजली आहेत. ते निर्भिड आणि स्वाभिमानी बाण्याचे जनप्रतिनिधी होते.

www.surajyadigital.com    सोमवार दि. २ जानेवारी २०२२    वर्ष : २१ वे    अंक : ९७ वा किंमत : ५ रुपये    पाने ८

# पांगरीच्या फटाका कारखान्यात भीषण स्फोट; अग्नितांडवामध्ये तीन महिलांचा होरपळून मृत्यू

सुराज्य/बार्शी

**बार्शी तालुक्यातील पांगरीजवळच्या फटाक्याच्या कारखान्यात भीषण स्फोट होवून लागलेल्या आगीत तीन महिला कामगारांचा होरळपळून मृत्यू झाला असून तीन महिला भाजून गंभीर जखमी झाल्या आहेत. स्फोट इतका शक्तीशाली होता की, क्षणात आगीचे तांडव सुरू झाले तर धुराचे लोट पसरले. आवाजाने पांगरीचा परिसर हादरून गेला. आगीचे लोण आणि धुरांचे लोट यातच मदत कार्य सुरू होते. ही घटना रविवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास घडली. सारा सोलापूर जिल्हा नववर्षाच्या स्वागतात रमला होता. अशातच दुपारी ही धक्कादायक बातमी थडकताच संपूर्ण जिल्ह्यावर शोककळा पसरली.**



- आवाजाने दहा किमीचा परिसर हादरला
- आठवडी बाजारामुळे मोठा अनर्थ टळला
- जेवणाच्या सुट्टीमुळे काही महिला बचावल्या
- तीन महिला भाजून गंभीर जखमी

### आग आटोक्यात आली...

रात्री पावणे अकराच्या सुमारास पांगरी पोलीस ठाण्याशी संपर्क साधला असता, तेथील एपीआयखुणे यांनी सुराज्यशी बोलताना सांगितले की, रात्री आग आटोक्यात आली. त्यानंतर मृतदेश शोधण्याचे काम हाती घेतले. अग्निशामक दलाकडून ९ आगीचे बंब वापरून आग आटोक्यात आणली. स्थानिक लोकांची मदतही मिळाली. कौसल्या सुखदेव बगाडे(वय ३५, रा.पांगरी) या जखमी महिलेला सोलापूरच्या शासकीय रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

बार्शी तालुक्यातील पांगरी हद्दीतील एका फटाके निर्मिती कारखान्यास अचानक आग लागून झालेल्या दुर्घटनेत तीन महिला भाजून जागेवरच मृत्युमुखी पडल्या तर तीन महिला जखमी झाल्याचा दुर्दैवी प्रकार नववर्षाच्या पहिल्या दिवशी दुपारी २ वाजून ४७ मिनिटांनी घडला. मृतापैकी दोन महिलांची ओळख पटली आहे. सुमन ऊर्फ सुमित्रा ज्ञानोबा जाधवर (वय ५६ रा.वालवड ता.बार्शी), गंगाबाई मारुती सांगळे (वय ५० रा.उक्कडगाव) अशी मयताची ओळख पटलेल्याची नावे आहेत तर एक महिलेची ओळख पटलेली नव्हती.

कारखान्यात सतत स्फोट होत झाल्याने इतर जखमींचा शोध घेताना अडचणी निर्माण होत होत्या. कौशल्या सुखदेव बगाडे (वय ३० रा.पांगरी), मोनिका संतोष भालेराव (वय ३० रा.वालवड) या दोन जखमींना उस्मानाबाद येथील जिल्हा रुग्णालयात उपचारार्थ हलविण्यात आले आहे. त्यांची प्रकृती गंभीर आहे तर शकुंतला सुहास कांबळे (वय ३० रा.पांगरी) या किरकोळ जखमी झाल्या असून भेदरलेल्या अवस्थेतील त्यांच्यावर पांगरी ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याबाबत अधिक माहिती अशी की- पांगरी ते शिराळा रस्त्यावर पांगरीपासून तीन किमी अंतरावर युसुफ हाजी मणियार (रा.पांगरी) यांच्या मालकीचा इंडियन फायर वर्क्स या नावाने फटाके निर्मितीचा कारखाना आहे. या कारखान्यात दैनंदिन चाळीस ते पन्नास कामगार काम करत असतात. मात्र रविवारी पांगरी गावचा आठवडी असल्याने कारखान्यात ९ महिला व कारखान्याबाहेर दोन पुरुष काम करत होते. दुपारी जेवणाच्या सुट्टी दरम्यान हा स्फोटाचा दुर्दवी प्रकार घडल्याने काही महिलांचे जीव वाचले. स्फोटाचा आवाजाने दहा किमीचा परिसर हादरला धुराचे व आगीचे लोट परिसरात दिसून येत होते. या घटनेचे गांभीर्य वाटून पांगरी पंचक्रोशीतील असंख्य लोक घटनास्थळी दाखल झाल्याने जत्रेचे स्वरूप आले होते. त्यामुळे मदतकार्यात अडथळे येत होते.

आगी विझविण्यासाठी बार्शी, उस्मानाबाद, कुर्डूवाडी येथील अग्निशमन व रुग्णवाहिका मदत कार्यास दाखल झाल्या होत्या. येथील कारखान्यात वालवड, उक्कडगाव, पांगरी, चारे, पाथरी येथील महिला मजूर कामाला येतात. घटनास्थळी आ.राजेंद्र राऊत, जिल्हा पोलीस प्रमुख शिरीष सरदेशपांडे, तहसीलदार सुनील शेरखाने, उपविभागीय पोलीस अधीक्षक जालिंदर नालकुल, पो.नी अण्णासाहेब मांजरे, सपोनि नागनाथ खुने, सपोनि महारुद्र परजणे, ज्ञानेश्वर उदार आदींनी भेट देऊन मदतकार्य केले.

## चंदन झाडाची चोरी, सातजणांवर गुन्हा

**मोहोळ :** नरखेड येथील शेतकऱ्याचे शेतातील चंदनाचे झाड तोडून सुमारे ६० हजार किमंतीचे चंदन चोरून नेल्याची घटना ३१ डिसेंबर रोजी नरखेड येथे दुपारी ४ वाजनेचे सुमारास घडली. नरखेड येथील शेतकरी सुरज माणीकराव देशमुख यांच्या शेतात त्यांच्या वडीलानी लावलेले चंदनाचे झाड दुपारी ४ च्या सुमारास एका ओमनी कार मधुन ड्रायव्हर राहुल मोटे व इतर लोकांनी येऊन ते तोडून चोरून नेल्याची माहीती सुरज चे चुलते यांनी दिली.

सुरज यांनी नरखेड अनगर रस्त्यां वरून भरदाव वेगान येत असलेली गाडी अडवली असता त्यातील तीन महीला गाडीतून उतरुन त्यांच्या गाडीच्या पाठीमागे मोटार सायकल वरून येत असलेले तिन अनोळखी पुरुष याच्या गाडीवर चंदनाची लाकडे घेऊन पळून गेल्या. हे चंदन सुमारे विस किलो असुन किमंत सुमारे ६० हजार रुपये आहे. सुरज देशमुख यांनी दिलेल्या फीर्यादी नुसार गाडी चालक राहुल मोटे व अनोळखी तिन महीला तिन पुरुष यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला असुन अधीक तपास गणेश पोफळे करीत आहेत.

## एटीएम कार्डची अदलाबदल; ३ लाख ९२ हजारांची फसवणूक

**सोलापूर :** एटीएम कार्डची अदलाबदल करत एका अनोळखी इसमाने फिर्यादी दिगंबर मारुती जाधव यांच्या मुलाजवळील एटीएम कार्डची अदलाबदल करत २० दिवसात ३ लाख ९२ हजार रुपये काढून फसवणूक केली.तब्बल चार महिन्यानंतर जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.



फिर्यादी दिगंबर मल्हारी जाधव (वय-४९, रा.बक्षी हिप्परगा ता.दक्षिण सोलापूर) हे व्यवसायाने शेतकरी असून ५ ऑगस्ट २२ रोजी त्यांनी मुलास एटीएम कार्ड देऊन स्टेट बँक ऑफ इंडिया मार्केट यार्ड शाखेतून पैसे काढण्यास सांगितले. पैसे कसे काढायचे हे मुलाला समजले नसल्याने त्याच्या पाठीमागे उभे असलेल्या अज्ञात इसमाने पैसे काढण्याची मदत करत त्याच्याकडून एटीएम कार्डचा पासवर्ड मिळविला. मुलास २० हजार रुपये काढून दिले.

दरम्यानच्या काळात त्यांनी हातचलाखी करत एटीएम कार्डची आदलाबदल करत दुसरे एटीएम कार्ड त्याच्याकडे दिले. त्यानंतर त्या इसमाने त्या एटीएम कार्डचा वापर करत ही रक्कम काढून घेतली. फिर्यादी जाधव यास आपली फसवणूक झाली असल्याचे दिसून आल्याने त्यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून,या घटनेचा अधिक तपास पोलीस सहाय्यक पोलीस निरीक्षक ताकभाते हे करत आहेत.

## काडादींना रिवॉल्व्हर परत मिळणार का? आज फैसला

सुराज्य/सोलापूर

सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांच्या रिवॉल्व्हरचा परवाना तीन महिन्यांसाठी निलंबित करण्यात येऊन त्यांचे रिवॉल्व्हरपोलिसांत जमा करण्यात आले होते.

परंतु, यापुढे तशी चूक होणार नाही, असे काडादी यांनी लेखी दिल्यानंतर स्वरक्षणार्थत्यांना ते पुन्हा दिले जाऊ शकते. आज पोलीस आयुक्त त्यावर निर्णय घेतील अशी शक्यता आहे. होटगी रोडवरील विमानतळावरून विमानसेवा सुरू करावी, या प्रमुख मागणीसाठी सोलापूर विकास मंचच्या पदाधिकाऱ्यांनी काही दिवस चक्री उपोषण केले होते. काडादी यांनी उपोषण स्थळी जाऊन केतन शहा यांना त्यासंबंधीचा जाब विचारला. यावेळी शाब्दिक चकमक वाढत गेली.आणि रागाच्या भरात काडादी यांनी खिशातील रिवॉल्व्हर काढून.केतन शहा यांना गोळ्या घालण्याची धमकी दिली होती.



पोलिस आयुक्त डॉ.राजेंद्र माने यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचा शस्त्र परवाना काही दिवसापूर्वी तीन महिन्यांसाठी निलंबित करण्यात आला होता.

## दारू न पाजल्याच्या कारणावरून काठीने मारहाण; दोघे जखमी


सुराज्य/सोलापूर

दारू का पाजत नाही या कारणावरून शेतातून बोलावून काठी आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणींत दोघेजण जखमी झाले. ही घटना हिंगणी (ता.बार्शी) येथे शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली. या प्रकरणात वैरागच्या पोलिसांनी तिघाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



विक्रांत विकास गव्हाणे (वय २१ रा. हिंगणी) आणि त्यांचे मामा अशोक चौधरी असे जखमींची नावे आहेत. या प्रकरणात विक्रांत गव्हाणे यांनी पोलिसात तक्रार दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी दशरथ त्याचा भाऊ किसन कानडे आणि मुकेश नावाचा इसम या तिघाविरुद्ध गुन्हा दाखल केला. विक्रांत गव्हाणे हे त्यांच्या मामाच्या शेतात गेले होते. रात्रीच्या सुमारास दशरथ कानडे याने त्याला फोन करून दारू का पाजत नाही? म्हणून शिवीगाळ केली. आणि त्याला हिंगणी येथील पुलावर बोलावून घेतले. आणि तिघांनी मिळून मारहाण केली. अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार घाडगे पुढील तपास करीत आहेत .







**सिद्धेश्वर दर्शनासाठी रांग...** नववर्षानिमित्त रविवारी ग्रामदैवत श्री सिध्दारामेश्वरांचे दर्शन घेण्यासाठी मंदिरात भाविकांची झालेली गर्दी...

# सोलापुरातील दोन रेशन दुकानांचा परवाना रद्द, अनामत रक्कमही जप्त

- अन्नधान्य वितरण अधिकारी सुमित शिंदे यांचा दणका
- दुकानांची फेरतपासणी चालू; दुकानदारांवर टांगती तलवार

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



यांच्या वक्तव्याचं करायचं काय?

**सोलापूर :** शहरातील रेशन दुकानातील काळा बाजारासंदर्भात तक्रार प्राप्त झाल्यानंतर अन्नधान्य वितरण अधिकारी सुमित शिंदे यांनी सरसगट रेशन दुकानाची तपासणी करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार चार पथकांच्या माध्यमातून केलेल्या तपासणीमध्ये दोषी आढळल्याने 'ड' परिमंडळ विभागातील सिध्दारूड नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित संचलित दुकान नंबर (क ३९) आणि विशाल सहकारी ग्राहक संस्था रास्तभाव दुकान नंबर (क ७०) या दोन दुकानाचे परवाने रद्द करत अनामत रक्कम जप्त केली आहे.

अन्नधान्य वितरण अधिकारी शिंदे यांनी काळाबाजार करणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारल्याने रेशन दुकानदारांचे धाबे दणाणले आहे. तर काही दुकानांची फेरतपासणी चालू आहे. या तपासणीत आणखी काही दुकानदारांवर कारवाईची टांगती तलवार आहे. या फेरतपासणीमध्ये काही दुकानदारांचे परवाने रद्द होण्याची शक्यता असल्याने काळाबाजार करणाऱ्या दुकानदारांमध्ये खळबळ



माजली आहे. शहर मध्यच्या आमदार प्रणिती शिंदे यांनी रेशन दुकानाच्या माध्यमातून वितरण करण्यात येणाऱ्या धान्याचा काळाबाजार केला जात आहे. गोरगरिबांच्या तोंडचा घास पळवणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली होती. आ. शिंदे यांच्या तक्रारींवरून शहरातील सर्व रेशन दुकानाची तपासणी करण्यात आली होती. यामध्ये चार पथकांची नियुक्ती करून सरसगट सर्व दुकानाची तपासणी केली होती.

या तपासणी पथकाला तपासणीमध्ये मोठा सावळा गोंधळ आढळून आला होता. कागदपत्र गायब, दुकान बंद,शासनाच्या योजनाची माहिती दुकानात लावली नाही, धान्य तपासणीसाठी दफ्तर उपलब्ध करून दिले नाही, असे प्रकार आढळून आले होते. या तपासणी पथकांचा अहवाल अन्नधान्य वितरण अधिकारी ऑगस्ट महिन्यामध्ये अन्नधान्य वितरण अधिकाऱ्यांना सादर केला होता. या तपासणी अहवालाची तपासणी करून दोषी असलेल्या रेशन दुकानदारांना एक संधी देत नोटिसा बजावत खुलासा करण्याचे आदेश अन्नधान्य वितरण अधिकाऱ्यांनी दिले होते. ऑक्टोबरपर्यंत सर्व नोटिसा बजावलेल्या दुकानदारांचा लेखी खुलासा प्राप्त झाला आहे. त्यापैकी दुकान नंबर (क३९ ) आणि दुकान नंबर ( क ७० ) दुकानदारांनी दिलेला खुलासा असमाधानकारक असल्याने महाराष्ट्र अनुसूचित विक्रेय वस्तू वितरण कायद्याच्या तरतुदी मधील शर्ती अटींचा भंग झाल्याने दुकानाचा परवाना रद्द करत अनामत रक्कम जप्त करण्याचे आदेश दिले आहेत.

**दोन दुकानांवर ठेवला ठपका :** तपासणीच्या वेळी दुकानात धान्य आढळून आले नाही, धान्य वाटपाचे दफ्तर उपलब्ध करून दिले नाही, पॉश मशिन आढळली नाही, धान्य वाटपात अपहार झाल्याचे निदर्शनास आले, शिधापत्रका धारकांच्या अनेक तक्रारी, लाभार्थ्यांच्या याद्या दर्शनी भागात लावल्या नाहीत. धान्याचे नमुने पारदर्शक बरणीमध्ये ठेवले नाहीत. धान्याचा साठा आढळला मात्र रजिस्टर नसल्याने तफावत मोजता आली नाही. धान्य वाटपामध्ये अनियमितता आढळून आली. प्राधिकारण पत्राचे नूतनीकरण केले नाही.

**'शिंदे' आडनावाचा योगायोग :** राज्यात सध्या शिंदे - फडणवीस सरकार आहे. या काळात आ. प्रणिती शिंदे यांनी रेशन दुकानातील काळाबाजाराची तक्रार केली होती. या तक्रारीची दखल घेऊन अन्नधान्य वितरण अधिकारी सुमित शिंदे यांनी कारवाईचा बडगा उगारला. या संपूर्ण प्रक्रियेत तीन शिंदे आडनावाचा योगायोग जुळून आला आहे.

CMYK